.. Sadguru Arati ..

॥ श्री सद्गुरु आरती ॥

धन्य धन्य हे प्रदक्षिणा सद्गुरुरायाची ।
झाली त्वरा सुरवरां विमान उतरायाची ॥ धृ ॥

पदोपदीं अपार झाल्या पुण्याच्या राशी ।
सर्वही तीर्थें घडलीं आम्हा आदिकरुनि काशी ॥ १ ॥

मृदंग टाळ घोळ भक्त भावार्थें गाती ।
नामसंकीर्तनें ब्रह्मानंदें नाचती ॥ २ ॥

कोटि ब्रह्महत्या हरती करितां दंडवत ।
लोटांगण घालितां मोक्ष लोळे पायांत ॥ ३ ॥

गुरुभजनाचा महिमा न कळे आगमा- निगमांसी ।
अनुभव ते जाणती जे गुरुपदिंचे रहिवासी ॥ ४ ॥

प्रदक्षिणा करूनि देह भावें वाहिला ।
श्रीरंगात्मज विठ्ठल पुढें उभा राहिला ॥ ५ ॥

इति

Please send corrections to sanskrit@cheerful.com
Last updated January 26, 1999